
ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक - वर्ष -२ रे • अंक २ रा • डिसें २०१४ - मार्च २०१५ • मूल्य १००रु.

*International Level Refered Research Journal*



संपादक
कैलास गणपतराव कानिंदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 2 रे • अंक 2 रा • डिसेंबर 2014 मार्च 2015

• संपादक : प्रा. कैलास कानिंदे •

• कार्यकारी संपादक •

डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)

मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)

प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)

प्रा.संदिप गोरे (वसमत)

प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)

डॉ.बालाजी विजापुरे (भोकर)

प्रा. राहुल पंडित (जुन्नर)

प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)

प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)

प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

प्रा.नामदेव डोंगरे (चिपळूण)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| १ | शिक्षकांची भूमिका आणि जबाबदारीची जाणिव | डॉ.कृष्णा शेंडे | ०१ |
| २ | स्त्री भ्रूणहत्या एक समाजशास्त्रीय दृष्टिकोनात | डॉ.बी.एम.कांबळे | ०४ |
| ३ | तृतीयपंथीयांच्या नातेसंबंधाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास | कैलास कानिंदे | ०७ |
| ४ | पंचायत समिती सदस्यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ : हिमायतनगर तालुका | प्रा.डोंगरे एल.बी | १३ |
| ५ | मराठवाड्यातील वीरमाता व युध्द विधवा : पुनर्वसन व कल्याणकारी योजनांच्या संदर्भात महत्वाच्या शिफारसी | लेफ्ट.प्रा.डॉ.आर.पी.गावंडे | २० |
| ६ | भारतातील दूरशिक्षणाचे महत्व | प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे | २३ |
| ७ | मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर: एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.फिसफिसे तुकाराम रामराव | २७ |
| ८ | सामाजिक न्याय आणि मानवी हक्क | डॉ.सचिन जगन्नाथ होले | ३२ |
| ९ | 'रत्नागिरी जिल्हयातील बँक व विमा कंपन्यांचे पुनरावलोकन १९०० ते १९६०' | प्रा. सत्येंद्र विजय राजे | ३४ |
| १० | स्त्री हिंसाचार आणि उपाय | प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे | ३७ |
| ११ | उच्च शिक्षणात दलित -महिलांची भूमिका | डॉ. आप्पाराव रामराव वागडव | ३९ |
| १२ | संशोधनातील नैतिकता | रगडे दत्तराम रामजी | ४२ |
| १३ | कृषी उत्पादनाच्या आधारभूत किंमतीतील बदलांचा अभ्यास | प्रा.डी.के.मगर | ४४ |
| १४ | भारतातील विस्थापितांचे : एक अध्ययन | डॉ. प्रदीप एच. गजभिये | ४८ |
| १५ | नारायण सुर्वे यांच्या कवितेतील विद्रोह | प्रा.प्रल्हाद जाधव | ५२ |


Scanned by CamScanner

 ISSN 2321-9572

# भारतातील दूरशिक्षणाचे महत्त्व

प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे
श्री शिवछत्रपती महाविद्यालय,जुन्नर

**सारांश** – विद्यार्थी आणि शिक्षक या दोन घटकांतील भौतिक अंतरामुळे, छापील साहित्य व आधुनिक तंत्रज्ञान यांच्या दुव्यामुळे ह्या दोन घटकांमध्ये सुसंवाद साधला जाऊन जे शिक्षण मिळते ते दूरस्थ शिक्षण होय. प्रचंड लोकसंख्या, अपुरी औपचारिक शिक्षण प्रणाली, भौगोलिक दुर्गमता, औपचारिक शिक्षणामध्ये येणारी मर्यादा यामुळे शिक्षणामध्ये अडथळे निर्माण होतात. दूरशिक्षणाच्या माध्यमातून नोकरदार, व्यावसायिक, महिला, दुर्गम भागातील वंचित समाजघटक व वेगवेगळ्या कारणांनी खंड पडल्याने शिक्षणापासून दूर गेलेल्या घटकांना शिक्षण घेण्याचा एक सार्थ पर्याय निर्माण झाला आहे. पत्राद्वारे, वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन, टेलिफोन, टेलिकॉन्फरन्स, व्हीडीओ कॉन्फरन्स, मेल या आधुनिक साधनांच्या साहाय्याने कमी खर्चात चरितार्थ सांभाळून शिक्षण घेता येते. देशात मानवसंसाधनाचा विकास होणे गरजेचे आहे. देशातील लोकसंख्येतील सर्वाधिक लोकसंख्या तरूणांची आहे. त्यांच्याकडे कौशल्य निर्माण होईल असे शिक्षण देण्याची गरज निर्माण झालेली आहे. दुर्गम दऱ्याखोऱ्यात राहणारा आदिवासी समाज, परंपरा रुढींमध्ये गुंतलेल्या जाती – जमाती, महिला यांना शिक्षण घेण्यामध्ये आलेल्या मर्यादांना दूर करण्यामध्ये दूर शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्ये, अभिक्षमता, इष्ट वर्तन व चारित्र्य यांच्या जोपासनेची व्यवस्था. कुटुंबातून सुरू होणारी ही प्रक्रिया आयुष्यभर अनेक मार्गांनी चालू राहते. शिक्षण देणाऱ्या विविध संस्थांपैकी शाळा या औपचारिक संस्थेवर भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या, निरक्षरता यासारख्या अनेक कारणांमुळे अवलंबून राहता येणार नाही. औपचारिक शिक्षण हे ठराविक शैक्षणिक संस्थांमार्फत दिले जाते. ते देताना निश्चित उद्देश, कालावधी, नियम, पात्रता या बाबी निश्चित केलेल्या असतात. मात्र भारतासारख्या विकसनशील देशात हे शिक्षण घेताना अनेक अडथळे येतात. आर्थिक समस्या, प्रापंचिक समस्या, खेडोपाडी शिक्षणाची असलेली दुरावस्था, उदरनिर्वाहासाठी कामधंदा, शिक्षणात खंड, वाढते वय, नोकरीमुळे वेळेची अनुपलब्धता, मुलींच्या शिक्षणाबाबतचा निरूत्साह, स्त्री शिक्षणाची समस्या, अपंगत्व यासारख्या कारणांमुळे पूर्णवेळ उपस्थित राहून शिक्षण घेता येत नाही. वरील सर्व कारणांमुळे वंचित राहिलेल्या घटकांची गरज भागविण्यासाठी दूरस्थ शिक्षणासारखा सुकर मार्ग नाही. दूरस्थ शिक्षण हा शिक्षणाचा एक उत्तम पर्यायी मार्ग आहे.

**दूरस्थ शिक्षणाची संकल्पना** – दूरस्थ शिक्षणाची संकल्पना विविध तज्ज्ञांनी मांडलेल्या आहेत. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे–

**Holmerg** - 'The various forms of study at all levels which are not under continuous, immediate supervision of tutors, present with their students in lecture rooms or on the same premise, but which never the less, benefit form the planning, guidance and tution of tutorial organisation'.

**Michel Moore** - 'A family of instructional methods in which teaching behaviours, are executed a part from learning behaviours, including those which is a continuous situation would be performed in the learner must be facilitated by print, electronic, mechanical and other devices.'

**पीटर** – दूरस्थ शिक्षण ही एक अप्रत्यक्ष अध्ययन पद्धती होय. या शिक्षण पद्धतीत शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक व भावनिक ताटातूट असते. प्रचलित शिक्षण पद्धतीत शिक्षक व विद्यार्थी एका वर्गात, समोरासमोर, समाजाने तयार केलेल्या नियमांनुसार उपस्थित असतात. तर दूरस्थ शिक्षण हे तंत्रविज्ञानाच्या नियमांवर आधारित असते.

जेव्हा विद्यार्थी व शिक्षक हे दोन्ही घटक एकमेकांपासून अंतर व परिसराच्या दृष्टीने दूर असतात. अशावेळी या दोन्ही घटकांना जोडणारा एकमेव दुवा म्हणजे दूरस्थ शिक्षण होय.

वरील व्याख्यांवरून, दूरशिक्षण वर्गातून न मिळणारे परंतु सर्व प्रकारचे शिक्षण सतत देणारे, सुयोग्य नियोजनाद्वारा व सम्यक मार्गदर्शनाच्या माध्यमातून आणि स्वाध्यायावर आधारलेले आहे. यात शिक्षक पडद्यामागे



Scanned by CamScanner

असतो.

**दूरस्थ शिक्षणाचे स्वरूप व व्याप्ती** –भारतासारख्या देशात 'सर्वांसाठी शिक्षण' ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल तर औपचारिक शिक्षणव्यवस्थेवर पूर्णत: अवलंबून राहणे चुकीचे ठरेल. १०वी, १२वी किंवा पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करून खंड पडलेल्यांसाठी शिक्षणाचे विविध पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत. मुक्त विद्यापीठ, निरंतर शिक्षण, पत्राद्वारे शिक्षण, मुक्तशाळा प्रणाली यासारख्या माध्यमांतून दूरशिक्षण घेता येणे शक्य आहे.

दूरशिक्षणाची माध्यमे

**१. पत्राद्वारा शिक्षण** –ज्या विद्यार्थ्यांना शाळेत हजर राहता येत नाही, ज्यांची शिक्षण घेण्याची इच्छा आहे. पण वेळापत्रकातील वेळेनुसार शिक्षण घेण्यात अडचणी येतात. नोकरी, व्यवसाय तसेच अन्य कारणांमुळे शिक्षणात खंड पडला आहे. अशा व्यक्तींना पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण ही एक संजिवनी ठरली आहे. भारतात मुंबई विद्यापीठाने १९७२ पासून पत्रव्यवहारामार्फत अभ्यासक्रम संचालनालय सुरू केले. मात्र सर्वप्रथम हा प्रयोग दिल्ली विद्यापीठात राबविण्यात आला. जागतिक स्तरावर १९३८ च्या प्रथम आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहार शिक्षक परिषदेतील सहभागी वक्ते Knute O. Broady म्हणाले होते, By equality of educational Opportunity we mean extending education to everyone no matter how humble his birth, no matter where he may live and no matter what his reasonable aspirations may be.

भारतातील अनेक विद्यापीठामार्फत पत्राद्वारा शिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

**२. मुक्त विद्यालये व मुक्त विद्यापीठे** –दूरस्थ शिक्षण देण्यामध्ये मुक्त विद्यापीठांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. उच्च शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र ठरलेल्या मुक्त विद्यापीठांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. कुलश्रेष्ठ एस. पी. यांनी म्हटल्याप्रमाणे, मुक्त विद्यापीठ म्हणजे असे एक खुले पुस्तक आहे की, कोणीही कितीही प्रमाणात व कोणत्याही वेळी यामध्ये अध्ययन करू शकतात. १९६९ मध्ये जगातील पहिले मुक्त विद्यापीठ इंग्लंड येथे सुरू झाले. आंध्र प्रदेशामध्ये १९८२ मध्ये तर १९८५ मध्ये दिल्ली येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. महाराष्ट्रामध्ये १९९० मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या रूपात नाशिक येथे स्थापना झाली. नोकरदार, महिला, व्यावसायिक, कामगार यांना वेळेच्या अभावी औपचारिक शिक्षण घेता येत नसल्याने मुक्त विद्यापीठ हे एक महत्त्वाचे माध्यम त्यांच्यासाठी उपयुक्त ठरले आहे.

**३. आकाशवाणी व दूरदर्शनाद्वारे शिक्षण** –आकाशवाणी, दूरदर्शन ही शिक्षणाची प्रभावी माध्यमे आहेत. २१ व्या शतकामध्ये उपग्रहांच्या यशस्वी प्रयोगामुळे आकाशवाणी दूरदर्शनमध्ये क्रांती झालेली दिसून येते. १९७५ पासून भारत सरकारने SITE-Sattelite Instructional Television हा शैक्षणिक उपक्रम चालू केला आहे.

**भारतातील दूरशिक्षणाच्या संप्रेषणाचे मार्ग** –दूरस्थ शिक्षणातील महत्त्वाचा भाग हा विद्यार्थ्यांशी होणाऱ्या संप्रेषणाशी निगडीत आहे. पत्राद्वारा शिक्षणाबरोबरच आधुनिक कालखंडात संप्रेषणात झपाट्याने होत असलेल्या बदलांचा स्वीकार दूरस्थ शिक्षणामध्ये होताना दिसून येत आहे. दूर शिक्षणाच्या साधनांमध्ये पिढी दर पिढी होत गेलेला विकास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

दूरशिक्षणाची पहिली पिढी : मुद्रित साधने, वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके, छायाचित्रे, पत्राद्वारा शिक्षण

दूरशिक्षणाची दुसरी पिढी : आकाशवाणी, टेलिग्राफ, टेलिफोन, टेलिव्हीजन इत्यादी

दूरशिक्षणाची तिसरी पिढी : संगणक, डीव्हीडी

दूरशिक्षणाची चौथी पिढी : टेलिकॉन्फरन्स, टेलिस्क्रिन, व्हीडीओ टेक्ट, अभासी अध्ययन वर्ग इ.

नवीन पिढीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात असला तरी मागील पिढीतील माध्यमांचा आधारही घेतला जातो. त्यामुळे नवीन पिढी इतकी जुन्या पिढीतील माध्यमे तितकीच कार्यक्षम आहेत.

**भारतातील दूरशिक्षणाचे महत्त्व** –एकविसाव्या शतकात विकासाकडे वाटचाल करणाऱ्या भारतासारख्या विकसनशील देशामध्ये लोकसंख्या, देशाची भौगोलिक रचना, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात असलेली विविधता, रूढी परंपरांमध्ये असलेली विविधता ही भारताचे वेगळेपण निश्चित करते. या घटकांचा विचार करता १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य होण्यामध्ये दूरशिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे पुढील मुद्द्यांद्वारे दिसून येईल.

**१. ज्ञानाचा स्फोट**–तंत्रज्ञानाच्या विकासानंतर ज्ञान मिळविण्याच्या माध्यमांमध्ये झपाट्याने बदल झाले. ज्ञानप्राप्तीची विविध माध्यमे उपलब्ध झाली. संगणक, इंटरनेट, भ्रमणध्वनी या माध्यमातून संप्रेषणाचा वेग वाढला. विज्ञानातील नवनवीन शोध, जैव–रसायनशास्त्राने केलेली क्रांती, संशोधनास मिळालेली चालना या बाबींमुळे



Scanned by CamScanner

 ISSN 2321-9572

ज्ञानाचा स्फोट घडून आला. हे ज्ञान मिळविण्याच्या औपचारिक मार्गावर मर्यादा आल्या. त्यामुळे प्रचंड ज्ञानाचे व्यवस्थापन, संप्रेषण व रूजवणूक करण्यासाठी निर्माण झालेल्या विद्याशाखा अपुऱ्या पडू लागल्या. भारतातील ज्ञान, माहिती प्रसारित करण्याच्या दृष्टीने दूरशिक्षण महत्त्वपूर्ण ठरले आहे.

२. **लोकसंख्या वाढ आणि शिक्षण** – गेल्या तीन दशकांमध्ये लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाली. वाढत्या लोकसंख्येबरोबर विद्यार्थी संख्या वाढणे क्रमप्राप्त ठरले. या वाढलेल्या विद्यार्थी संख्येस सामावून घेण्यासाठी शैक्षणिक संस्थांवर, प्रशासनावर भार पडला. सर्वांनाच औपचारिक शिक्षणव्यवस्थेत सामावून घेणे गरजेचे असले तरी भारतामध्ये हे चित्र दिसून येत नाही. त्यामुळे औपचारिक शिक्षणास प्रभावी पर्याय म्हणून दूरशिक्षणाचा मार्ग महत्त्वपूर्ण आहे.

३. **भौगोलिक रचना, दुर्गम भागातील शिक्षण** – भारताच्या एकूण क्षेत्रफळामध्ये दुर्गम, दऱ्याखोऱ्यांचा भाग मोठ्या प्रमाणात व्यापलेला आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाचे प्रमाणही लक्षणीय आहे. १५ टक्के क्षेत्र हे आदिवासी दुर्गम भागांचे आहे. भारताची ८.६१ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. एकट्या महाराष्ट्रात ५१४६६ चौ.कि.मी. क्षेत्रफळ हे आदिवासी क्षेत्र आहे. अशा भागात शिक्षणाचा प्रसार होण्यामध्ये मोठ्या प्रमाणात मर्यादा निर्माण झाल्याचे दिसून येते. दुर्गम भागात सर्वदूर शिक्षण पोहचू न शकल्यामुळे या भागात साक्षरतेचे प्रामण कमी असल्याचे दिसून येते. २००१ च्या जनगणनेनुसार ५५.२ टक्के साक्षरतेचे प्रमाण महाराष्ट्रातील आदिवासी समाजामध्ये दिसून येते. या दुर्गम भागासाठी दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाचा विस्तार होणे शक्य आहे.

४. **मानव संसाधनांचा विकास** – देशाचा आर्थिक विकास मानव संसाधनाच्या विकासावर अवलंबून आहे. मात्र वाढती लोकसंख्या, औपचारिक शिक्षणातील गुणवत्तेच्या व कौशल्याधारित शिक्षणाचा अभाव यामुळे प्रचलित शिक्षणव्यवस्थेतून मानव संसाधनांच्या विकासावर मर्यादा येताना दिसून येत आहे. देशातील तरुण लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेता शिक्षणाच्या विविध पर्यायांच्या साहाय्याने मानव संसाधनाचा विकास शक्य आहे. यातील एक महत्त्वपूर्ण पर्याय म्हणून दूरशिक्षणाकडे पाहिले जाते.

५. **आर्थिक स्थिती आणि शिक्षण** – भारताचा आर्थिक विकासाच्या दराची घसरण, देशातील बेकारी व महागाई या सर्वांचा परिणाम शैक्षणिक धोरणापासून ते सर्वसामान्यांच्या शिक्षणापर्यंत सर्वांवर होताना दिसून येत आहे. औपचरिक शिक्षणासाठी लागणारा मोठ्या प्रमाणातील पैसा, शिक्षणावर मर्यादा अणतो. त्यातून निरक्षरतेचे प्रमाण वाढते. दूरशिक्षणाच्या साहाय्याने कमी खर्चामध्ये शिक्षण उपलब्ध होत असल्याने आर्थिक दूरावस्थेत कमी खर्चात उच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले आहे.

६. **चरितार्थ व शिक्षण यांची सांगड**– व्यवसाय, नोकरी यांच्या मार्फत रोजगाराची उपलब्धता झाल्यानंतर म्हणजेच चरितार्थाचे साधन प्राप्त झाल्यानंतर दूरशिक्षणाच्या माध्यमातून खंडीत झालेले किंवा पुढील शिक्षण पूर्ण करता येते. अर्थार्जनाच्या कालावधीमध्ये शिक्षण घेता येत असल्यामुळे व्यवसाय व नोकरीस अनुसरून अधिकची शैक्षणिक आर्हता प्राप्त होते.

७. **'सर्वांना शिक्षण' पूर्ण साक्षरतेचे ध्येय** – भारतासारख्या खंडप्राय देशात सर्वांना शिक्षण हे ध्येय साध्य करायचे असेल तर दूरशिक्षणाशिवाय पर्याय नाही. नोकरी, व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती महिला, दुर्गम भागातील लोक यांना साक्षर करण्याचे, शिक्षण देण्याचे पूरक माध्यम म्हणून दूरशिक्षण महत्त्वाचे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ७४.०४ टक्के भारतीय लोक साक्षर आहेत. साक्षरतेची टक्केवारी वाढताना जरी दिसत असली तरी पूर्ण साक्षरतेचे ध्येय दूर असल्याचे दिसून येते. अल्पशिक्षित समाजघटकांना शिक्षण देण्याचे माध्यम म्हणून दूरशिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे.

८. **भारतातील स्त्री शिक्षणाचा विकास** – भारतात शिक्षणापासून वंचित राहण्याचे प्रमाण अधिक असणारा वर्ग म्हणजे स्त्रीयांचा वर्ग होय. भारतातील कुटुंबव्यवस्था, रूढी–परंपरा, स्त्रीयांकडे व त्यांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्त्री–शिक्षणावर व पर्यायाने स्त्रीयांच्या विकासावर झालेला दिसून येतो. २०११ च्या जनगणनेनुसार पुरूष साक्षरता ८२.१४ टक्के तर स्त्री साक्षरता ६२.४६ टक्के असलेली दिसून येते. यातही ग्रामीण व आदिवासी दुर्गम भागातील महिलांचे प्रमाण कमी आहे. साक्षरतेच्या या प्रमाणाचा स्त्रीयांच्या उच्च शिक्षणावरही परिणाम होतो. कुटुंबव्यवस्था, गृहजीवन यामुळे खंडीत झालेले शिक्षण मार्गस्थ होण्यामध्ये दूरशिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. स्त्री शिक्षणातून स्त्रीयांच्या विकासाकडे वाटचाल होण्याचा मार्ग सुकर होतो.

९. **प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षणास सहाय्यभूत** – शिक्षण ही सतत व अव्याहत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे निरंतर शिक्षणास आधुनिक कालखंडात महत्त्वाचे स्थान



Scanned by CamScanner

प्राप्त झाले आहे. दूरशिक्षणाच्या साहाय्याने प्रौढ व निरंतर शिक्षणाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत झालेली दिसून येते.

**१०. दूरशिक्षणातून दर्जात्मक विकास** – नोकरी, व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती, महिला, दुर्गम भागातील व्यक्ती यांच्या शैक्षणिक वाटचालीला दूरशिक्षणातून गती मिळतेच पण त्याचबरोबर दर्जात्मक विकासही घडून येतो. व्यवसायास अनुरूप शिक्षण घेता येते. अभिरूचीनुसार शिक्षण निवडता येते. या सर्व पर्यायामुळे दूरशिक्षणातून दर्जात्मक विकास मोठ्या प्रमाणात साध्य होताना दिसून येत आहे.

**११. लोकशाहीचे बळकटीकरण** – शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय म्हणजे लोकशाहीचा विकास व संवर्धन करणे हे होय. लोकशाहीचे बळकटीकरण करण्यासाठी लोकशाही नागरिकत्व निर्माण होण्याची आवश्यकता आहे. भारतासारख्या मोठ्या लोकशाहीप्रधान देशामध्ये औपचारिक शिक्षणाबरोबरच दूरशिक्षणही महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. लोकांना आपल्या हक्काबरोबरच स्वत:ची कर्तव्ये कोणती आहेत. राष्ट्रविकासासाठी, लोकशाही व्यवस्था टिकविण्यासाठी त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. विविध भाषा, परंपरा, रूढी, धर्म, संस्कृती असूनही राष्ट्रीय एकात्मतेच्या बळावर भारताचा सर्वांगीण विकास साध्य होताना दिसून येत आहे. ते केवळ लोकशाही मुल्यांच्या आधारावर होत असल्याने लोकशाहीचे संवर्धन होणे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात विकसनशील भारतातील शिक्षणप्रक्रियेमध्ये दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. लोकसंख्यावाढीमुळे निर्माण झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येला सामावून घेण्यामध्ये दुर्गम भागातील समाजापर्यंत ज्ञानाचे स्त्रोत उपलब्ध करण्यामध्ये दूरशिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे.

**संदर्भ**


१.पवार ना. ग. (१९९१), भारतीय शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह, पुणे, नूतन प्रकाशन.

२.भोसले र. अ. आणि डोणे उ. म. (२००९), शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

३.नागतोडे किरण (२००६), शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचारप्रवाह, नागपूर, विद्या प्रकाशन.

४.घोरमोडे के. यु. आणि घोरमोडे क. कृ. (२००६), भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान, नागपूर, विद्या प्रकाशन.

५.नानकर प्र. ल. आणि शिरोडे संगिता (२०१०), वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

६.शेवतेकर शारदा आणि निकुमे मदन (२०११), भारतीय शिक्षक–शिक्षण प्रणाली, नागपूर, विद्या प्रकाशन.

7.Borah Swapna (1987), Distance Education, Delhi, Amar Prakashan.

8.Chander N. Jose, Management of Distance Education, Banglore, Sterling Publication.

9.http://www.slideshare.net/emilystephi/importance-of-distance-education-in-indian-higher-education-system

1. http://smude.edu.in/blog/distance-education/the-need-of-distance-education-in-india




Scanned by CamScanner